# ।। आनंदन ।।

*आपण आपल्या आरोग्याची, अक्षय आनंदी जीवनाची जबाबदारी आपल्या स्वत:च्या खांद्यावर घेऊ, चला, आरोग्य नंदन म्हणजे आनंदन ची स्थापना करू.*

## १. लोक आरोग्य :— ***आरोग्य चिकित्सा पध्दती, धृतराष्ट्री सरकार, दुर्योधनी बाजार आणि आपली शेंडी दुसऱ्याच्या हातात देऊन निर्धास्त झोपी गेलेला समाज?***

आजच्या घडीला आरोग्याच्या क्षेत्रामध्ये निरनिराळ्या 'थेरपी' चा मुक्त संचार सुरू आहे. प्रत्येक थेरपीचे एक्सपर्ट तज्ज्ञ आपापली थेरपी कशी श्रेष्ठ, विज्ञाननिष्ठ, विवेकशील इत्यादी सांगतांना ईतर थेरपी कुचकामी, ढोंगी, बनावटी असल्याचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष इशारा देत आहोत.

कुठली पध्दती (पॅथी) चांगली वाईट हे ठरविण्याच्या पलीकडे जाऊन ह्या सगळ्या पॅथींचे आणि त्यांच्या पंथांचे झालेले बाजारीकरण ह्याची चिकित्सा करण्याची आज वेळ आलेली आहे.

ॲलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेदिक, युनानी इत्यादी पॅथींनी ''बाजार संस्कृती'' च्या दरबारात आपापली दुकानं टाकलेली आहेत. अत्याधुनिक आकर्षक आवेष्टनात (पॅकेजिंग) आरोग्य विकायला ठेवलेले आहे. ज्यांची कुवत (आर्थिक) आहे, त्याने यावे, आरोग्य विकत घेऊन जावे! ज्याची पैसा फेकण्याची कुवत जास्त, त्याच्या मालकीचं आरोग्य! पैसा कमावणे आणि फायदा उचलणे (परिस्थितीचा) ह्या दोन रूळावरून भन्नाट वेगानं जात मागच्या दहा—वीस वर्षात मोठमोठ्या कंपन्यांनी आपापली साम्राज्ये लोकांच्या आजारावर पोसली, विस्तारित केली, त्यांचा वेलू गेला गगनावरी! नित्य नवीन रोग, रोगांची आणि रोग्यांच्या संख्येत केलेली भरमसाठ वाढ, मग प्रचंड वेगाने पानगळ नियमित होत गेली त्यात नवल ते काय? झाडू मारून किंवा खोऱ्यांनी पैसा गोल करण्याचे दिवस कालाआड जाऊन यंत्रांनी पैसा गोळा केला आणि मोजला जाऊ लागला!

ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, युनानी सगळ्याच औषधे निर्माण करणाऱ्या कंपन्या मालामाल झाल्या. पहिल्या नंबर वर असलेल्या सन फार्माचं भांडवल एक लाख चार हजार एकशे एकोणनव्वद कोटी रूपया पर्यंत तर दहाव्या नंबर वर असलेल्या पिरामलचं भांडवल नऊ हजार चारशे छप्पन्न कोटी रूपये. आयुर्वेदिक औषधे निर्माण करणारी डाबर पाचव्या स्थानावर तर इमामी अकराव्या स्थानावर आहे. सांगण्याचं तात्पर्य, बाजार संस्कृतीत सगळ्या पॅथी मालामाल झाल्या आणि समाज परावलंबी झाला.

मागची काही वर्ष इंग्लंड मध्ये राहून गांधीजींच्या विचारांचा प्रचार—प्रसार करणाऱ्या सतीशकुमारांचे (रीरुजन्स ह्या पत्रिकेचा संपादक आणि शुमाकर कॉलंजचा प्रवर्तक) म्हणणे आहे; एखाद्या जंगली सावजावर झडप घालल्यास बसलेल्या कोल्हयासारखं ह्या औषध कंपन्या आजारी माणसावर आणि आजारपणांवर नजर लावून बसतात हा लाजीरवाणा प्रकार आहे आणि मानवी संस्कृतीला काळीमा फासणारे कृत्य आहे. एका बाजूने हे खरे असले तरी हेही पण तेवढेच महत्वाचे आहे की बहुतांश

आजाराची मुळे ह्या मानवी संस्कृतीत सापडतात. (कॅन्सर, लठ्ठपणा, हृदय विकार इत्यादी): दुषीत अन्न, दुषीत वायू, दुषीत पाणी, अति कामाचा ताण, एकटेपणा, सामुदायिक जीवनाचे विघटन इत्यादी.

सरकारची धोरणे वस्तुस्थितीशी विसंगत असावी ह्यात नवल ते काय? सरकारची पावले खाजगी औषधी कंपन्यांच्या फायद्याचा विचार करत वाटचाल करतांना जनसामान्यांच्या प्रश्नांना कळवळा दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करतांना दिसतात. मागच्या सहा वर्षात केंद्र सरकारने ५२८३२ कोटी रूपये एन. आर. एच. एम. अंतर्गत प्राथमिक आरोग्य सेवा सुधारण्यावर खर्च केले. हा स्तुत्य उपक्रम म्हणावा लागेल. परंतू दुसऱ्या बाजूने असंसर्गजन्य रोगांचे कुरण खाजगी क्षेत्रासाठी राखीव ठेवले, हे काही अनावधानाने घडलेल आहे असे म्हणता येणार नाही.

योजना आयोगानुसार (वर्ष २००८) नागरी/शहरी वस्त्यात राहणाऱ्यांची संख्या ३८ कोटी होती आणि ह्या वस्त्यांमधील गरीबीचे प्रमाण १५% वरून (वर्ष १९७०) २५% वर (वर्ष २००५) पोचलेले आहे. पण कुठल्याही पक्षाचे सरकार असले तरीही असंसर्गजन्य रोगाचे कुरण ''माल गुजार'' औषधी कंपन्यांसाठी राखीव राहिलेले आहे.

माग्देलेना रबान, राखी दाडनोना व ललित दाडनोना (पब्लिक हेल्थ फॉउंडेशन ऑफ इंडिया) ह्यांनी केलेल्या एका अभ्यासानुसार असंसर्गजन्य रोगांचे प्रमाण समाजातल्या सगळ्याच घटकांमध्ये पोचलेले आहे. अशा तऱ्हेच्या रोगामुळे (वेगवेगळ्या विकलांगता) पुर्ण लोकसंख्येची ४३% आयुष्यमान वर्षे आपण घालवून बसलेलो आहोत आणि ५०% मृत्यू हे असंसर्गजन्य रोगांनीच होत आहेत.

## २. जनता—जनार्दन: ज्ञान—वृत्ती/प्रवृत्ती—आचरण:—

- ♣ **वर्तन घंटानाद :—** १३.९% लोकसंख्या रोज तंबाखूचे सेवन करत आहे, १४% लोक शारीरिकरीत्या निष्क्रिय आहेत (आळशी म्हणावीत का?).

- ♣ **मेटाबोलिक घंटानाद :—** ३२.५% लोकांना उच्च रक्तदाब (BP) आहे, जवळपास १०% लोकांच्या रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण वाढलेले आहे, ११% लोक लठ्ठ आहेत, २% लोक अतिलठ्ठ आहेत आणि २८% लोकांचे कोलेस्टेरॉल वाढलेले आहे (वर्ष २००४).

- ♣ **असंसर्गजन्य रोगांनी मरण पावलेल्यांची टक्केवारी ५३% :— ह्यापैकी २४% हृदय विकाराने, ११% फुफ्फुस, ६% कॅन्सर आणि २% डायबेटिसने मरण पावलेल्यांची संख्या.**

*ज्ञानाच्या पातळीवर आपले अध:पतन जवळपास झालेले आहे. घरातल्या घरात सापडणारे उपाय, कुटुंबाच्या पातळीवर केल्या जाणाऱ्या रोग प्रतिबंधक खान—पानाच्या पध्दती आणि गाव किंवा समाजाच्या पातळीवर आरोग्य ज्ञानाचे देवाण—घेवाण काळाच्या उदरात गडप झालेले आहे. हे एका बाजूला तर दुसऱ्या बाजूने व्यावसायिक, सामाजिक आणि वैयक्तिक आचरणामुळे मनाचे संतुलन बिघडलेले, ताण वाढलेला, BP व रक्तामधील साखरेचे प्रमाण वाढलेले. समाजाचे निरोगी राहण्याचे भान सुटलेले आहे का? वैय्यक्तिक आणि कुटुंबाच्या पातळीवर आजारी पडल्यावर डॉक्टर, हॉस्पिटल आणि फार्मसीकडे धाव घेणाऱ्या समाजामध्ये निरोगी राहण्याच्या काही किल्ल्या होत्या. डॉक्टर आणि नवीन वैद्यकीय व्यवस्थेने ह्याचा ठेका कधी घेतला आणि हे आरोग्यभान कधी सुटलं कळलंच नाही.*

## ३. चला, सोबत—सोबत ही पायवाट मळूया, आनंदन घडवूया :—

आम्ही एक वेगळी पायवाट मळण्याचा संकल्प हृदयाशी बाळगून आहोत. आम्हाला विश्वास आहे, की समाज आपल्या निरोगी राहण्याचा, सुखी—समाधानी आयुष्याचा आणि स्वयंसिध्द मार्गावरून चालण्याची जबाबदारी स्वत: घेईल. आमचा विश्वास आहे की, एका छोट्या समाजाची निर्मिती जो ह्या मार्गावर चालून निरोगी आणि सुखी, समाधानी होईल; हे पहिले पाऊल आहे. तुम्ही सोबत केली, तर असा समाज बनवणे काय कठीण? चला, आपण सोबत एक नवी पायवाट मळूया, तिमिराकडून एक एक निरंजन पेटवत आरोग्याचे नंदन घडवू या; आनंदन घडवूया.

## ४. आम्ही म्हणजे?

आम्ही आमच्या आरोग्यासाठीच्या सावलीत एक वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या तरूण—तरूणींचा समूह गेल्या दोन—अडीच वर्षात उमलत आहे. सुरूवातीला डॉक्टर प्रशांत हया आयुर्वेदिक शिक्षण घेतलेल्या तरूणाने एक छोटीशी कल्पना डॉक्टर सतीश गोगुलवार ह्यांच्यासमोर मांडली. त्या पुर्वी, ह्या तरूणाने वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर देशभ्रमण करून, वेगवेगळ्या वैदू, डॉक्टर, ह्यांच्या सोबत चर्चा करून निरनिराळ्या पध्दती समजुन घेऊन एक वेगळी वाट चालण्याचा निर्णय केला. त्याला ह्या वाटेवर सोबत केली त्यांच्या तीन मित्रांनी (सुरवातीला)आणि कुरखेडा व नागपुर इथे असंसंर्गजन्य रोगावरच क्लिनिक सुरू झाले. आजच्या घडीला पाच जणाचा हा वैद्यकीय चमू (प्रशांत, विराज, नम्रता, मोहनीश, उज्ज्वला) नागपुर आणि कुरखेडा इथे निष्ठेने कार्य करत आहे. त्यांना आम्ही आमच्या आरोग्यासाठी ह्या संस्थेने निधी गोळा करून मदत केलेली आहे.

## ५. तुम्ही—आम्ही एक होऊ—आनंदन घडवू :—

मागची दोन—अडीच वर्ष आम्ही आमच्या आरोग्यासाठी ह्या संस्थेने आमचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मदत केली. कुठल्याही प्रोजेक्ट किंवा दान संस्थेचे पाठबळ नसतांना हे धारिष्ट्य आम्ही आमच्या आरोग्यासाठीने दाखविले. आता पुढे सुध्दा प्रोजेक्ट किंवा एखाद्या मोठ्या दान संस्थेकडुन मोठी मदत घेण्यापेक्षा समाजातील संवेदनशील, चिंतनशील, आरोग्यभान असलेल्या, एक नवा समाज घडवू पाहणाऱ्या आमच्या मित्र आणि मैत्रिणी कडून छोटी छोटी मदत घ्यावी, त्यांच्या तुमच्या ऋणात सदैव राहत, त्यांच्या तुमच्या आशीर्वादाने एक एक निरांजनाने उजेडाची नवी पहाट घडवावी, हे स्वप्न तुम्ही आम्ही एक होऊ, आनंदन घडवू.

५.१ तुम्ही आम्हाला सूचना करून, आमच्या मार्गाविषयी नवीन कल्पना सुचवू शकता. तुमच्या अमूल्य कल्पना आमच्यासाठी फार मोलाच्या आहेत.

५.२ ह्या कार्यासाठी आम्ही एक Corpus, एक गंगाजळी/देणगी फंड गोळा करण्याचा संकल्प केलेला आहे. तुम्ही स्वत: ह्या गंगाजळी मध्ये आपली ओंजळ टाकू शकता (देणगीसाठी कुठल्याही प्रकारचा आग्रह नाही). तुम्ही तुमच्या मित्रांना/मैत्रीणींना सागू/लिहू शकता की, त्यांनी ह्या कार्यासाठी मदत करावी. अन्यथा तुम्ही तुमच्या मित्र/मैत्रिणीची नावे (पत्ता/ई—मेल/फोन नंबर सहीत) आम्हाला कळवू शकता, आम्ही त्यांच्याशी पत्र व्यवहार करू.

५.३ तुम्ही स्वत: असा Corpus गोळा करण्यासाठी वेळ देऊ शकता.

५.४ तुम्ही तुमच्यासाठी व तुमच्या कुटुंबियासाठी नागपुर किंवा कुरखेडा इथे कधीही येऊन उपचार घेऊ शकता. कुरखेडा इथे तुमची राहण्याची व जेवणाची सोय आम्ही आनंदाने करू. ह्यासाठी वार्षिक ५००० रूपये (देणगी स्वरूपात) तुम्ही दिले तर आम्हाला आनंद होईल.

५.५ तुम्ही तुमच्या मित्र/मैत्रिणींसाठी व त्यांच्या कुटुंबियासाठी अशा तऱ्हेच्या उपचार किंवा निरोगी राहण्याच्या सल्ल्यासाठी प्रेरित करू शकता.

५.६ आम्ही आमच्या आरोग्यासाठी ही संस्था ह्या कार्यासाठी एक व्यापक परिषदेचे गठन करू इच्छित आहे. ही परिषद पुढे जाऊन ह्या कार्यक्रमाचे संचालन करतानाच हया कार्याचे स्वरूप ठरवेल. ही परिषद कार्यक्रमाच्या संचालनासाठी एका कार्यकारी समितीचे गठन करेल.

५.७ परिषदेच्या संस्थापक सदस्य आजीवन सभासद असतील. निर्मित परिषद सभासद शुल्क, परिषदेचे नियम व अन्य बाबी ठरवेल. तुम्ही ह्या परिषदेचे सदस्य व्हावेत अशी आमची मनापासून इच्छा आहे.

हा कार्यक्रम डॉक्टर प्रशांत कुचनकर, डॉक्टर सतीश गोगुलवार ह्यांच्या मार्गदर्शनाखाली चालवत आहे व पुढे चालवणार आहेत. तुमच्या काही सुचना असतील तर तुम्ही त्याच्यासोबत शेअर करू शकता. त्यासाठी खालील ई–मेलवर आणि/किंवा फोन वर संपर्क करावा.

१. डॉ. प्रशांत /८२७५४००२२०/ tarun.seva@gmail.com
२. डॉ. सतीश गोगुलवार /९४२२१२३०१६/ arogyasathi@gmail.com
३. चंद्रकांत शेटकर /९९३०८०२२५७/ canta.caar@gmail.com

टिप :– आम्ही आमच्या आरोग्यासाठी ह्या संस्थेच्या नावाने चेक/बॅंक ट्रान्स्फर करावी. आम्ही आमच्या आरोग्यासाठी ह्या संस्थेकडे देणगी दिल्यास ८० टक्के आयकरात सूट मिळेल. व्यतिरिक्त आणि त्यांच्या पलीकडे अद्वितीय आनंदन चे तुम्ही सोबती व्हाल!!!!

## For Contact :- aanandlok@gmail.com

## Bank Account Detail :-

Bank Name :- State Bank of India

Branch Code :- 5909

IFSC Code :- SBIN0005909

Customer Name :- Amhi Amcha Arogya Sathi Kurkheda (Anandan)

Account Number :- 32201352572